-: प्रेसनोट दिनांक - २८/११/२०२३ :-

**आरोपी लोकसेवक सुनिल जगन्नाथ जाधव, वय - ५० वर्षे, कृषी अधिकारी, वर्ग-२, जिल्हा कृषी अधिकारी कार्यालय, कसबा बावडा, कोल्हापूर,सद्या रा. इंद्रजीत कॉलपी, गंगाधाम अपार्टमेंन्ट, जाधववाडी,कोल्हापूर, मुळ रा. पलॅट नंबर ३४,अंजली कॉलनी, शाहुपूरी सातारा, जि.सातारा यांनी लाच मागणी करून ती लाच रक्कम स्विकारलेबाबत.....**

---

तक्रारदार हे जैविक शेती तसेच सेंद्रीय शेती करण्याबाबत शेतकरी लोकांना मार्गदर्शन करत असतात तरी त्यांना शेतीला लागणारे खत, बि, बियाणे आणि किटकनाशके यांची विक्री करण्याकरिता त्यांना स्व:ताचे दुकान चालु करावयाचे होते. त्याकरीता आवश्यक असलेला परवाना (लाससन) मिळण्याकरीता तक्रारदार यांनी जिल्हा कृषी अधिकारी कार्यालय, कसबा बावडा, कोल्हापूर येथे ऑनलाईन अर्ज केला होता. सदरचा अर्ज मंजुर करून पुढील कार्यवाही करून वरीष्ठांच्याकडे पाठविणेकरीता जिल्हा कृषी अधिकारी कार्यालय, कसबा बावडा, कोल्हापूर येथील श्री सुनिल जाधव कृषी अधिकारी यांनी तक्रारदार यांचेकडे १०,०००/- रू. दयावे लागतील असे म्हणुन पैशाची मागणी केली.

तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे तक्रार अर्ज दिला. तक्रारीप्रमाणे दिनांक २८/११/२०२३ रोजी पडताळणी केली असता पडताळणीमध्ये आरोपी लोकसेवक सुनिल जगन्नाथ जाधव, कृषी अधिकारी यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांनी परवाना (लाससन) मिळणेकरीता केलेला ऑनलाईन अर्ज मंजुर करून पुढील कार्यवाही करून वरीष्ठांच्याकडे पाठविणेकरीता तक्रारदार यांचेकडे प्रथम १०,०००/- रूपयांची मागणी करून तडजोडीअंती ९,०००/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर सापळा कारवाई आयोजीत केली असता पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांचेकडुन आरोपी लोकसेवक सुनिल जगन्नाथ जाधव, वय - ५० वर्षे, कृषी अधिकारी यांनी तक्रारदार यांचेकडे मागणी केलेली लाच रक्कम ९,०००/- रूपये स्विकारलेने त्यांना रंगेहाथ पकडणेत आले.

सदरबाबत **आरोपी लोकसेवक सुनिल** जगन्नाथ जाधव, **वय - ५० वर्षे, कृषी अधिकारी, वर्ग-२, जिल्हा कृषी अधिकारी कार्यालय, कसबा बावडा, कोल्हापूर,सद्या रा.** इंद्रजीत **कॉलनी, गंगाधाम अपार्टमेंन्ट, जाधववाडी,कोल्हापूर, मुळ रा. पलॅट नंबर ३४,अंजली कॉलनी, शाहुपूरी सातारा,** जि.सातारा यांचेविरूध्द शाहुपूरी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करणेची कारवाई सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. अमोल तांबे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे, श्री. विजय चौधरी, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे, श्री सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांचे मार्गदर्शनानुसार श्रीमती आसमा मुल्ला, पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली, कर्तव्य, अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर, श्रेणी पोउपनिरी श्री संजिव बंबरगेकर, पो.हे.कॉ.अजय चव्हाण, पो.हे.कॉ. विकास माने, पो.ना. सचिन पाटील, पो.ना. सुधिर पाटील, अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील क्रमाकावर** संपर्क साधावा.

१) **मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक** विभाग, म.रा.मुंबई टोल **फ्री कमांक :- १८००२२२०२१**

२) **मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक** विभाग, पुणे परिक्षेत्र, **पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.**

३) **श्री.सरदार नाळे,** पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक **विभाग कोल्हापूर मो.नं. ९६७३५०६५५५ कार्यालय दुरध्वनी कमांक** - ०२३१/२५४०९८९.

४) **हेल्पलाईन टोल फ्री कमांक**:- १०६४.

५) **व्हॉटस अप कमांक** :- ७८७५३३३३३३.